# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ३१.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ३०.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ५१ केसेसमध्ये ५१ ईसमांवर कारवाई करून २,१९,३९५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०३९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२५,१००/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :– चोरी करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०५.२०२६ चे १०.३० वा. ते दिनांक ३०.०५.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत जयंती मेंशन क्र. ०८, फ्लॅट क्र. १०३, मनिषनगर येथे राहणारे फिर्यादी याज्ञिक तिलकचंद रहांगडाले वय ३३ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलूप लावून परिवारासह उज्जैन येथे देवदर्शनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मागील बेडरुमचे उघडे खिडकीतून, आत प्रवेश करुन बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख २,५०,०००/–रु. व ०९ घडयाळे असा एकूण किंमती २,५९,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि रानी भोसले ८८८८७१५२८४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापूर :– फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, प्लॉट क्र. ९६, शिवनगर, झिंगाबाई टाकळी, गोंधनी येथे राहणारे फिर्यादी गोवर्धन भोजराज वरठी वय ५६ वर्षे यांना आरोपी १) अजित जिन्ना वय ३५ वर्ष रा. जरबरा, शिव इलाईट, खापरी शासकीय कॉलेज जवळ, नागपूर २) वैभव सुरजुसे वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ५४, बाबा फरीदनगर, नागपूर ३) अमोल जिराफे वय २६ वर्ष रा. एसबीआय बॅकेंजवळ, शांतीनगर, नागपूर यांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ याने तो डब्ल्यूसीएल जरीपटका येथे मॅनेजर असल्याचे सांगून फिर्यादीचे मुलीस डब्ल्यूसीएल येथे नौकरी लावून देण्याचे आमिष दाखवून फिर्यादीकडून आरोपी क्र. २ याचे खात्यावर

आरटीजीएस द्वारे व स्वत:चे खात्यावर फोन पे द्वारे एकूण १७,००,०००/— रु. घेतले. आरोपी क्र. ३ याने फिर्यादीचे घरी जावून डब्ल्यूसीएल येथे अधिकारी असल्याचे सांगून व्हेरीफिकेशन केले. तसेच आरोपी क्र. २ याने कार्यालयीन सही शिक्के असलेले मेडीकल करण्याबाबतचे बनावट लेटर फिर्यादीचे घरी नेऊन दिले. फिर्यादी यांनी त्या पत्राचे आधारे त्यांचे मुलीची कुणाल हॉस्पिटल येथून वैद्यकीय तपासणी करुन घेतली. आरोपी यांनी फिर्यादीचे मुलीला नियुक्तीपत्र न दिल्याने विचारना केली असता, आरोपींनी नेहमी टाळाटाळ केली. फिर्यादी यांनी जरीपटका ऑफीस येथे जावुन चौकशी केली असता, आरोपी क्र. १ हा तेथील सेक्युरिटी गार्ड असल्याचे समजले. आरोपींनी संगनमत करुन दिनांक १३.०६.२०२३ ते दिनांक १८.१२.२०२३ दरम्यान फिर्यादीचे मुलीला नौकरी लावून देण्याचे बहाण्याने फिर्यादीकडून १७,००,०००/— रू. घेऊन बनावट दस्ताऐवज देऊन नौकरी लावून न देता तसेच अशाच प्रकारे तक्रारदार शुभम मरगदे यांचेकडून सुध्दा त्यांचे लहान भावाला नौकरी लावून देण्याचे आमिष दाखवून खोटे दस्ताऐवज देऊन त्यांचेकडून १४,००,०००/— रु. घेऊन दोघांचाही अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची एकूण ३१,००,०००/— रु. ची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. छगन शिंगणे ९९२३६९६८३९ यांनी आरोपींविरूध्द कलम ४१९,४६५,४६८,४७१,५०६,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :—** दिनांक ३०.०५.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, आऊटर रिंग रोड, उप्पलवाडी पुलाखाली एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे व वाढलेले, दाढी —वाढलेली, नग्न व बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोउपनि जयराम देशमुख यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( राहुल रोटे )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**